अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र






वर्ष ४२ वे


अंक १२ वा

१० डिसेंबर २०२१

किंमत १ रूपया


"श्री दत्त जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा...!"

# अष्टमी उत्सव - २०२१



**महालक्ष्मी पूजन**

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही मंगळवार दि. १२ ऑक्टोबर २०२१ रोजी, काका गद्रे सभागृहात, श्री महालक्ष्मी पूजन सोहळा मोठ्या आनंदात, उत्साहात, कोरोना काळात पाळावयाचे सर्व नियम पाळून साजरा करण्यात आला. सौ. आसावरी सहस्रबुद्धे यांनी महालक्ष्मीची पूजा सांगितली. पूजेसाठी २१ सुवासिनी उपस्थित होत्या पूजेचे ऑनलाईन पद्धतीने देखील आयोजन केलेले असल्याने, ऑनलाइन माध्यमावर पाहून ऐकून आपापल्या घरी नऊ सुवासिनींनी महालक्ष्मीची पूजा यथासांग केली.

फुले, पत्री, दुर्वाचा तातू का वापरावे, तसेच पूजा करताना पेहेराव, केशभूषा कशी असावी, त्यामागील कार्यकारणभाव काय असावा याची सविस्तर माहिती सौ. मंगला जोगळेकर यांनी दिली. नंतर आरती व कहाणी वाचन झाले. परंपरेप्रमाणे जमलेल्या सर्व स्त्रियांनी प्रसादाचा लाभ घेतला.

अष्टमी उत्सवात मनापासून सहभाग नोंदवणाऱ्या, मदत करणाऱ्या भगिनी सकाळी नऊ वाजल्यापासूनच तिथे जमल्या होत्या. सकाळच्या पूजेची तयारी, साहित्य वाटप, रांगोळी, सजावट यासाठी सर्वजणी मनापासून सहकार्य करीत होत्या.

संध्याकाळच्या कार्यक्रमाची तयारी जेवणानंतर लगेचच सुरू करण्यात आली. मुखवटा तयार करणे व श्री महालक्ष्मीला सजवून उभी करणे हे मोठे जोखमीचे काम असते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सौ. संध्या केळकर यांनी अतिशय सुबक, रेखीव मुखवटा तयार केला.

झेंडूच्या फुलांच्या माळांच्या सजावटीत, प्रकाशाच्या झोतात, गुलबाक्षी रंगाची साडी लेवून सर्व अलंकारांसह नटलेली, सुगंधी गजरे व फुलांचा हार माळलेली देवीची मूर्ती अत्यंत देखणी व तेजस्वी दिसत होती.

संध्याकाळची देवीची पूजा सौ. स्मिता आपटे यांनी सांगितली व सौ. सुवर्णा सहस्रबुद्धे यांनी ती यथासांग केली.

गेल्या दीड वर्षापासून सुरू असलेल्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संध्याकाळी ऑनलाईन पद्धतीने देवीच्या दर्शनाचा लाभ आपल्या भक्तांना दिला. तसेच जवळचे काही सदस्य, भगिनी देवीच्या दर्शनासाठी प्रत्यक्ष आले होते.

देवीच्या उत्सवासाठी कार्यकारणीतील भगिनींनी श्री सूक्त म्हणले, जोगवे गायले, देवीच्या गाण्यांनी वातावरण भक्तीमय केले. दर्शनासाठी आलेल्यांनी देवीची ओटी भरून घागरी फुंकल्या व आशीर्वाद घेतले.

कोणतेही काम.... अनेक हातांच्या मदतीशिवाय पूर्ण होत नाही.

संस्थेच्या सर्व कार्यक्रमात.... चित्तपावन ब्राह्मण संघ... नाशिकचे सर्व पदाधिकारी यांचा पाठिंबा व सहकार्य असते.

कार्यालयीन कर्मचारी यांची पण खूप मदत होते.

अष्टमी उत्सवाच्या यशस्वितेसाठी.... ह्या महिला सदस्यांनी मोलाचं योगदान दिले.... कार्यकारिणी सदस्या.... मंगला जोगळेकर, मैथिली गोखले.... तसेच वासंती फाळके, ऐश्वर्या साने, अमृता वाड, स्मिता रानडे, माधवी जोगळेकर, जान्हवी नातू, सुनिता परांजपे, जयश्री दामले, अर्पिता घारपुरे, सुवर्णा सहस्रबुद्धे, अदिती देवधर, सायली गोखले, संध्या केळकर या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

**- शब्दांकन**

**सौ. अर्पिता हेरंब घारपुरे**



**महालक्ष्मी पूजन**



**महालक्ष्मी प्रतिष्ठापना**



**घागरी फुंकणे कार्यक्रम**



**महिला मंडळ कार्यकर्त्या**

## देणगी : अष्टमी व नवरात्रोत्सवासाठी

१) **श्री. सुधीर साठ्ये,** नाशिक यांच्याकडून अष्टमी महालक्ष्मी पूजनासाठी देणगी रु. ५०१/-

२) **श्री. नरेंद्र पुरुषोत्तम जोगळेकर,** श्रीरामपूर, यांच्याकडून अष्टमी महालक्ष्मी पूजनासाठी देणगी रु. २००/-

३) **सौ. अनुराधा चंद्रशेखर साठे,** यांच्याकडून अष्टमी महालक्ष्मी पूजनासाठी देणगी रु. ५००/-

४) **श्री. विनय अरुण गाडगीळ,** यांच्याकडून अष्टमी महालक्ष्मी पूजनासाठी देणगी रु. १०१/-

५) **सौ. वैशाली माधव खरे,** नाशिक यांच्याकडून कै. माधव नारायण खरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महालक्ष्मी पूजन उत्सवासाठी देणगी रु.११,०००/-

६) **सौ. अनुपमा अनील लिमये,** यांच्याकडून अष्टमी देवीच्या साडीसाठी देणगी रु. १,०००/-

७) **सौ. जयाताई विनोद जोशी,** यांच्याकडून अष्टमी देवीच्या साडीसाठी देणगी रु. १,०००/-

८) **श्री. राजन रामचंद्र सोमण,** नाशिक यांच्याकडून अष्टमी नवरात्र उत्सवासाठी देणगी रु. २,०००/-

९) **सौ. अंजली गाडगीळ,** नाशिक, यांच्याकडून अष्टमी नवरात्र उत्सवासाठी देणगी रु. २,००१/-

## ❊ भावपूर्ण श्रद्धांजली ❊



पेठे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक, (सेवा निवृत्त) **श्री. भास्कर गणेश माटे** यांचे २५/०८/२०२१ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी दु:खद निधन झाले.

गणित व विज्ञान विषयात त्यांचा हातखंडा होता.



आपल्या संस्थेचे ज्येष्ठ सभासद आणि संस्थेच्या कार्यालयातील माजी कर्मचारी **श्री. विनायक गंगाधार मोडक** यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगी, जावई असा परिवार आहे.

**संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.**

## ❊ देणगी ❊

१) **श्रीमती माधवी अशोक गोखले,** नाशिक यांच्याकडून शिधावाटप योजनेकरिता देणगी रु. २,०००/-

२) **सौ. हेमा सुहास नातू,** नाशिक यांच्याकडून

कै. शंकर नारायण चिपळूणकर (तात्या), रु. २,०००/-.

कै. शैलजा शंकर चिपळूणकर, रु. २,०००/- यांच्या स्मरणार्थ.

३) **सौ. वृषाली प्रसाद शिंत्रे,** पुणे यांच्याकडून कै. श्री. प्रभाकर दत्तात्रय शिंत्रे, यांच्या स्मृतीप्रित्यर्थ

- शैक्षणिक मदतीसाठी - रु. १५,०००/-
- आर्थिक मदतीसाठी - रु. ५,०००/-

आणि कै. दामोदर रघुनाथ बापट, यांच्या स्मृती प्रित्यर्थ

- शिष्यवृत्तीसाठी - रु. १५,०००/-
- वैद्यकिय मदतीसाठी - रु. ५,०००/-

अशी एकूण देणगी रु. ४०,०००/-

**संस्थेतर्फे कृतज्ञतापूर्वक स्विकार आणि देणगीदारांचे मन:पूर्वक आभार...!**

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

# मिहिर कन्स्ट्रक्शन

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल : ०९४२२२४६८७८**
**ईमेल :** cvranade@gmail.com

।। जय जगन्नाथ ।।

खरे टूर्स

## आंबेजोगाई, परळी-बैजनाथ व पारदेश्र्वर ना नफा ना तोटा

**२५ फेब्रूवारी ते २८ फेब्रूवारी २०२२**

## अप्रतिम कर्नाटका

**१२ फेब्रूवारी ते १९ फेब्रूवारी २०२२**

मनगोड मॉनेस्ट्री, आर्यादूर्गा व महामाया मंदीरं, गोकर्ण, मुर्डेश्वर,मिर्झान फोर्ट, जोग फॉल, याना
निवासः ३ दिवस निसर्ग सानिध्यात (रिसॉर्ट-२५ एकर) व २ रात्र समुद्र सानिध्यात

## रॉयल बुंदेलखंड

**५ मार्च ते १३ मार्च २०२२**

**बांधवगड नॅशनल पार्कः** पट्टेरी वाघांकरिता प्रसिध्द ( खुल्या जीपमधून जंगल सफारी)
**खजुराहोः** चंदेल राजपूत राजांनी नगारा शिल्पकलेतील शैलित बांधलेले हिंदु व जैन मंदिर समूह जागतीक सांस्कृतिक वारसा लाभलेले आंतरराष्ट्रीय किर्तीचे ठिकाण
ओरछाः बेतवा नदी किनारी असलेल्या १६व्या शतकातील बुंदेलखंडाची राजधानी, वैभवी राजवाडे, उत्तुंग कोरीव मंदिरे, वैशिष्टपूर्ण समाध्या, चतुर्भुज मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर, जहांगीर महल, इ.
**अमरकंटकः** मैकल डोंगरा मधील नर्मदा, सोन अणि जोहिला नद्यांचे उगम स्थान विंध्य आणि सातपुडा पर्वतरांगांचा संगम

## काशी - गया - प्रयाग - अयोध्या - चित्रकूट

**१४ मार्च ते २४ मार्च २०२२**

**काशी :** काशीविश्वनाथ, कालभैरव, अन्नपूर्णा देवी,गंगाआरती, गंगाघाट
**गया :** मगध साम्राज्यातील महत्त्वाचे ठिकाण,विष्णूपाद, डुंगेश्वरी गुफा
**प्रयाग :** गंगा-यमुना-सरस्वती नद्यांचा त्रिवेणी संगम
**अयोध्या :** रामजन्मभूमी, नागेश्वर मंदिर, हनुमान गढी, कनकभवन इ.
**चित्रकूट :** श्रीराम-भरतभेतीचे स्थान, मा. नानाजी देशमुख यांच्या ग्रामोदय प्रकल्पाला भेट

**कोविड-१९ संदर्भातील सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे**

AC ROOMS AC BUS

**सहलीत चहा, कॉफी, नाश्ता, सुग्रास भोजन, स्थळ दर्शन, गाईड व प्रवेश फी इत्यादी खर्च अंतर्भुत आहेत.**

**सोबत स्वतःचे किचन असल्यामुळे जेवणाचे हाल नाहीत**

**विमान/ रेल्वे रिझर्वेशन जुन-जुलैमध्ये केले जाईल**

संपर्क : सतीष खरे ९८१९६११८६९ / शर्मिला खरे ९८१९०३१४३३
तळमजला, कल्पद्रुम प्रासाद, बालक मंदिर शाळेजवळ, दत्त आळी, कल्याण (प) दूरध्वनी : २२०८६३७

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक रोड, शाखा

दि. २३ ऑक्टोबर २०२१ रोजी, संध्याकाळी ७ वाजता, अंबा सोसायटीच्या हॉलमध्ये कोजागिरी उत्साहात साजरी झाली.

सौ. मंजुषा मिलिंद देशपांडे ह्यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हिंदी, मराठी, नवीन, जुनी, तसेच काही चंद्र गिते सादर करण्यात आली. श्री. पुष्कराज भागवत ह्यांनी संवादिनीवर, तर श्री. कुणाल काळे ह्यांनी तबल्यावर अतिशय उत्तम साथ केली. कु. अपूर्वा दांडेकर हिने सूत्रसंचालन केले. सुमारे दीड वर्षाने कार्यक्रम आयोजित केल्यामुळे मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाला वार्ड क्र. २० चे नगरसेवक श्री. संभाजी मोरुस्कर स पत्नी उपस्थित होते. चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिकचे श्री. अनिरुद्ध अभ्यंकर विशेष आमंत्रित म्हणून उपस्थित होते. अल्पोपहार आणि दुग्धपानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.








## गणेशोत्सव



**श्रीची प्रतिष्ठापना करताना श्री. अनिरुद्ध अभ्यंकर**



**उपस्थित भाविक**

## श्री निरंजन स्वामी पुण्यतिथी



**दि. १७/०९/२१ रोजी, श्री निरंजन स्वामी पुण्यतिथीनिमित्त निरंजन स्वामी मठात पवमांन अभिषेक कार्यक्रम संपन्न झाला.**

# सुखांत जीवनाचा

**लेखक : ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक**

– तत्पूर्वी जिल्ह्याधिकाऱ्यांनी गठीत केलेली समिती रुग्णाकडून, त्याने केलेल्या लिव्हींग विल मधील इच्छेबाबत खात्री करून घेतील, त्याला त्याच्या परिणामांची कल्पना असल्याची खात्री करतील व यदाकदाचित त्या वेळेला तो रुग्ण बोलण्याच्या किंवा समजण्याच्या अवस्थेत नसेल, तर सदर समिती इच्छापत्रातील नमूद व्यक्तीची (गार्डियन, नातेवाईक) त्यावर त्यांची संमती असल्याची सही घेतील.

– हॉस्पिटलच्या प्राथमिक अहवालावर, जिल्हाधिकारी यांनी गठीत केलेल्या समितीने, बोर्डाने शिक्कामोर्तब केले, तसा दाखला दिला की तो दाखला त्या बोर्डाचे प्रमुख जिल्हा वैद्यकिय अधिकारी त्या ठिकाणच्या न्यायाधीशांकडे तो सुपूर्द करतील. त्यानंतर ते न्यायाधीश स्वत: त्वरित त्या रुग्णाला भेट देऊन सर्व परिस्थितीचा आढावा घेतील व स्वत:ची खात्री झाल्यानंतर बोर्डाच्या अहवालाप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश देतील.

– येथे नमूद करणे आवश्यक आहे की ती व्यक्ती (एक्झीक्युटर) त्याचे इच्छापत्र / लिव्हींग विल त्याची अंमलबजावणी होईपर्यंत कोणत्याही क्षणी, कोणत्याही टप्प्यावर ते इच्छापत्र रद्द करू शकते.

**E] मेडिकल बोर्डाने संमती नाकारल्यास ? :**

– यदाकदाचित मेडिकल बोर्डाने प्राथमिक अहवालाप्रमाणे, सर्व तपासण्या करून इच्छापत्राप्रमाणे औषधोपचार थांबविण्यास अथवा काढून घेण्यास संमती नाकारली तर रुग्ण स्वत: किंवा तो त्या परिस्थितीत नसेल तर त्याचे जवळचे नातेवाईक किंवा औषधोपचार करणारे डॉक्टर किंवा हॉस्पिटलचे कर्मचारी / स्टाफ सुद्धा त्याविरूद्ध रिटपिटीशन / याचिका हायकोर्टात दाखल करू शकतात व तसे झाल्यास हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश केवळ या कामासाठी स्वतंत्र खंडपीठ नेमून जरूर पडल्यास ३ वेगवेगळ्या वैद्यक क्षेत्रातील निष्णात, ज्यांना २० वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे अशा तज्ज्ञ डॉक्टरांची समिती नेमू शकतात.

– अशी याचिका हायकोर्टात त्वरित सुनावणीसाठी घेतली जाईल व जरूर असल्यास तज्ञ डॉक्टरांच्या समितीकडून रुग्णाची तपासणी करून अहवाल मागविला जाईल.

– रुग्णाची शारीरिक, मानसिक स्थिती व रुग्णाचा आजार लक्षात घेता या याचिकेचा निर्णय लवकरात लवकर राज्य सरकारचे म्हणजे त्यांच्या वकिलांचे मत ऐकून लावला जाणे अपेक्षित आहे.

**F] केलेले लिव्हींग विल रद्द करण्याचा रुग्णाला अधिकार आहे का ? :**

– रुग्ण त्याने वर उल्लेख केलेल्या कार्यप्रणालीप्रमाणे करून ठेवलेले इच्छापत्र / लिव्हींग विल कधीही रद्द करू शकतो. असे लिव्हींग विल रद्द करताना आधी लिव्हींग विल करताना ज्या पद्धतीने ते केले त्याच पद्धतीने ते रद्द करणे जरूरीचे आहे.

– असेही होऊ शकते की इच्छापत्र / लिव्हींग विल करताना जी काही मानसिक, शारीरिक, कौटुंबिक किंवा आर्थिक परिस्थिती होती, त्यावेळी भविष्यात काय परिस्थिती उद्‌भवणार आहे याची कल्पना रुग्णाने केलेली नसते. आणि नंतर अचानक अशी परिस्थिती बदलते की त्या परिस्थितीचा इच्छापत्र करताना रुग्णाने विचार केला असता तर रुग्णाने इच्छापत्र किंवा लिव्हींग विल केले नसते. (अशावेळी पण रुग्ण इच्छापत्र रद्द करू शकतो) अशा परिस्थितीत रुग्णाचे इच्छापत्राप्रमाणे वर्तणूक करण्याचे बंधन रहाणार नाही.

– आधी उल्लेखिलेल्याप्रमाणे इच्छापत्र / लिव्हींग विल सुस्पष्ट शब्दांमध्ये लिहिलेले नसेल, त्याचा नीट अर्थ लागत नसेल किंवा काय सूचना लिहिल्या आहेत त्याबद्दल साशंकता असेल तर संबंधित मेडिकल बोर्ड. इच्छापत्राप्रमाणे कार्यवाही न करता, वैद्यकशास्त्रातील जरूर त्या उपाय योजना / प्रोटोकॉलप्रमाणे औषधोपचार चालू ठेवतील.

– हॉस्पिटल मेडिकल बोर्डाने सर्व तपासण्याअंती औपधोपचार थांबविण्याची शिफारस केली नाही. किंवा केली नसेल तर हॉस्पिटल मेडिकल बोर्ड जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या मेडिकल बोर्डाकडे अर्ज करून पुढील निर्देशांची मागणी करू शकते.

**G] लिव्हींग विल / इच्छापत्र केलेले नसेल तर ? :**

– एखाद्या रुग्णाने इच्छापत्र / लिव्हींग विल किंवा मेडिकल ॲडव्हान्स डायरेक्टिव लिहून ठेवलेले नसतील तरी सुद्धा टर्मिनली इल पेशंटस्‌साठी वर उल्लेखिलेली सर्व प्रोसिजर व सुरक्षेचे सर्व नियम व अटी अंमलात आणता येतील.

- रुग्ण ज्याचा आजार बळावला आहे. गंभीर आहे व कधीही बरा होणार नाही अशा अवस्थेत असेल व त्या रुग्णाने मेडिकल अॅडव्हान्स डायरेक्टीव्ह किंवा लिव्हींग विल / इच्छापत्र करून ठेवलेले नसेल तर त्या रुग्णाला औषध उपचार करणाऱ्या डॉक्टरने त्या हॉस्पिटलच्या व्यवस्थापनास तशा सूचना कराव्यात जेणे करून हॉस्पिटल व्यवस्थापन हॉस्पिटलचे वर उल्लेखिल्याप्रमाणे मेडिकल बोर्ड किंवा तज्ज्ञ डॉक्टरांची समिती गठीत करेल.
- असे मेडिकल बोर्ड, त्या रुग्णाच्या नातेवाईकांशी तसेच त्यांच्या फॅमिली डॉक्टरांशी चर्चा, विचारविनिमय करेल व तशा नोंदी ते त्यांच्या रेकॉर्डला घेतील. या चर्चेत रुग्णाची शारीरिक परिस्थिती, आजाराचे स्वरुप, कितीही प्रयत्न, खर्च, औषधोपचार केले तरी आजार बरा होणार नाही या गोष्टींची त्यांना कल्पना देतील व त्यानंतर नातेवाईकांनी औषधोपचार थांबविण्यास परवानगी दिली तर मेडिकल बोर्ड रुग्णावर पुढील उपचार कसे करायचे याबाबत प्राथमिक अहवाल तयार करेल.
- असा प्राथमिक अहवाल तयार झाल्यास व रुग्णावर औषधोपचार थांबविण्याचा निर्णय झाल्यास हॉस्पिटल मेडिकल बोर्ड त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांना कळवतील व जिल्हाधिकारी त्वरित स्वतंत्र मेडिकल बोर्ड (वर उल्लेखिल्याप्रमाणे) गठीत करतील, नेमतील. अशा मेडिकल बोर्डातील सर्व तज्ज्ञ डॉक्टर सदस्य रुग्णाची भेट घेतील, त्याला तपासातील, सर्व कागदपत्र, रिपोर्ट बघून चर्चा करून निर्णय घेतील व तो निर्णय रुग्णाला, त्याच्या नातेवाईकांना व स्थानिक प्रथम वर्ग न्यायाधीशांना कळवतील.

न्यायाधीश स्वत: रुग्णाची भेट घेतील व स्वत:चे समाधान होईपर्यंत चौकशी करून, कागदपत्रे बघून, रुग्णाशी, त्याच्या नातेवाईकांशी चर्चा करून मेडिकल बोर्डाच्या अहवालावर स्वत: टिपणी करून रुग्णाचा औषधोपचार थांबविण्यास हरकत नाही अशी सहमती नमूद करतील.

असेही होऊ शकते की प्राथमिक हॉस्पिटल मेडिकल बोर्डाने रुग्णाचा औषधोपचार थांबविण्यास नकार दिला, किंवा प्राथमिक मेडिकल बोर्डाच्या अहवालास कलेक्टरने नेमलेल्या मेडिकल बोर्डाने सहमती नाही दर्शवली, अशावेळी रुग्ण, रुग्णाचे नातेवाईक, गार्डियन किंवा औषधोपचार करणारे डॉक्टर किंवा हॉस्पिटलचा स्टाफ यापैकी कोणीही रुग्णाला औषधोपचार थांबविण्यास परवानगी मागण्यासाठी हायकोर्टात धाव घेऊन रिटपिटीशन / याचिका दाखल करू शकतात.

अशा याचिकेच्या सुनावणीसाठी हायकोर्ट त्वरित स्वतंत्र खंडपीठ नेमून जरूर पडल्यास स्वतंत्र तज्ज्ञ व वीस वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेल्या डॉक्टरांची समिती नेमून त्यांचा अहवाल व राज्य सरकारच्या वकिलांचे ऐकून लवकरात लवकर रुग्णांच्या हिताच्या दृष्टीने त्यांचा निर्णय घेतील.

वरील कोणत्याही परिस्थितीत, प्रथम वर्ग न्यायाधीशांनी दोन्ही मेडिकल बोर्डाच्या अहवालास सहमती दर्शविल्यास व तशी नोंद केल्यास ही बाब न्यायाधीश यांनी हायकोर्टाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. असा अहवाल लेखी स्वरूपात व डिजिटल माध्यमात हायकोर्टाचे रजिस्ट्री विभागात पुढील ३ वर्षापर्यंत जतन करून ठेवण्यात येईल.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपिठाने वरील न्याय निर्णय देतांना असेही निर्देशित केले आहे की जोपर्यंत लिव्हींग विल किंवा अॅडव्हान्स मेडिकल डायरेक्टीक संदर्भात केंद्र सरकार कायदा पारित करीत नाही तो पर्यंत या न्याय निर्णयात निर्देशित केलेली त्या संदर्भातील सर्व मार्गदर्शक तत्वे व पूर्वदक्षता, सुरक्षेचे सर्व घालून दिलेले नियम अमलात राहतील.

**निष्क्रीय इच्छामरण किंवा पॅसिव्ह युथेनिशीयाच्या संदर्भात सुस्पष्ट कायदा नसताना माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या ह्या न्याय निर्णयामुळे असहाय्य, अत्यवस्थ अवस्थेत खितपत पडलेल्या रुग्णांना व इच्छा असूनही अशा रुग्णांना मदत करण्यास कायद्याअभावी तयार नसणाऱ्या वैद्यकिय व्यावसयिक व नातेवाईकांसाठी ही एक मोठी उपलब्धीच आहे याची जाणीव चैतन्यला झाली. परंतु या स्वरूपाचा न्याय निवाडा २०१८ मध्ये होऊनही त्याची पुरेशी माहिती जनमानसात झालेली नाही ह्याची पण खंत चैतन्यला बोचू लागली.**

**पॅलीएटीव्ह केअर / एन्ड ऑफ लाईफ केअर -**

परंतु न्यायनिवाड्यातील अटी शर्ती व मार्गदर्शक तत्वाची पूर्तता केल्यावर रुग्णाचा, ज्याचा आजार बरा न होण्याच्या स्थितीत गेलेला आहे व ज्याच्या इच्छेप्रमाणे त्याच्यावरील औषधोपचार व कृत्रिम यंत्रणा काढून घेतलेल्या आहेत, थांबविलेल्या आहेत, अशा रुग्णाचे पुढे काय? त्याचा नैसर्गिक मृत्यू होईपर्यंत त्याची काळजी कशी घ्यायची? वगैरे प्रश्न चैतन्यला भेडसावू लागले व त्यामुळे तो आणखीनच अस्वस्थ झाला.

याबाबत त्याने तज्ज्ञ वैद्यकिय व्यावसयिकांबरोबर चर्चा केली तेव्हा त्याला 'एन्ड ऑफ लाईफ केअर' 'पॅलीएटीव्ह केअर', 'हॉस्पीस केअर' याबाबत माहिती मिळाली.

पॅलीएटीव्ह केअर म्हणजे रुग्णाला त्याच्या आजारातील दु:ख, मानसिक, शारीरिक यातना सुसह्य कशा होतील याची काळजी घेणे. ‘एन्ड ऑफ लाईफ केअर’ आणि ‘हॉस्पीस केअर’ या प्रकारांपेक्षा ‘पॅलीएटीव्ह केअर’ या प्रकाराची व्याप्ती अधिक आहे.

एन्ड ऑफ लाईफ केअर किंवा हॉस्पीस केअर हे प्रकार रुग्णाचे औषधोपचार संपलेले आहेत, कोठल्याच प्रकारच्या औषधोपचारांचा आता रुग्णावर फारसा परिणाम होणार नाही व त्याचा आजार हा कधीही बरा न होण्याच्या अवस्थेत गेलेला आहे अशा रुग्णांच्या बाबतीत जी काळजी घ्यायची ती ह्या दोन प्रकारात मोडते, समाविष्ट होते.

परंतु पॅलीएटीव्ह केअर ह्या प्रकारातील रुग्णांची घ्यावयाची काळजी हे केवळ त्याच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर घ्यायची नसून जेव्हा केव्हा त्या रुग्णाच्या गंभीर आजाराचे किंवा आजाराचे जो नंतर गंभीर स्वरूप घेण्याची शक्यता आहे, अशा आजाराचे निदान झाल्यानंतर आजारावरील ते बरे होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या औषधोपचारांबरोबर रुग्णाचे दु:ख निवारण, त्याचे मनोबल वाढविणारी, त्याच्या नातेवाईकांचे मनोबल वाढविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सर्व उपयांना पॅलीएटीव्ह केअर असे म्हटले जाते.

पॅलीएटीव्ह केअर किंवा दु:खनिवारक उपचार किंवा काळजी ही रुग्णाचे औषधोपचार चालू असतानाच रुग्णाचे आयुष्य कसे सुखकारक (त्यातल्या त्यात) असेल. त्याला कमीत कमी दु:ख, यातना कशा होतील, त्याचे मनोबल कसे वाढेल, त्याच्या कुटुंबियांना आवश्यक असल्यास आर्थिक मदत, मानसिक, सामाजिक आधार कसा मिळेल हे बघणे. आर्थिक मदतीबाबत सरकारच्या किंवा त्या त्या हॉस्पिटलच्या किंवा सामाजिक संस्थांच्या काही योजना आहेत का यांची माहिती रुग्णास किंवा त्याच्या नातेवाईकांना देणे.

मृत्यू ही एक कधीही टाळता न येणारी नैसर्गिक घटना आहे. रुग्णाला, ज्याला गंभीर स्वरूपाचा, जीवघेणा आजार आहे, असा मृत्यू लवकर येणार नाही किंवा तो अवास्तवपणे अनैसर्गिक रित्या लांबविला जाणार नाही याची पण काळजी घेणे आवश्यक आहे. अशा रुग्णाचे जे काही आयुष्य आहे ते आयुष्य तो त्याच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत सन्मानाने जगेल, त्याच्या मनाचा, शरीराचा सन्मान ठेवत, राखत जगेल हे बघणे आवश्यक आहे. गंभीर आजारावरील औषधोपचार बऱ्याच वेळेला साईड इफेक्ट करणारे असतात म्हणजेच रुग्णाच्या एखाद्या अवयवावर होणाऱ्या औषधोपचारांचा परिणाम त्यांच्या दुसऱ्या, चांगल्या अवयवांवर होण्याचा, चांगले अवयव पण व्याधीग्रस्त होण्याचा संभव असतो. अशा वेळी रुग्णाचे जीवन जास्तीत जास्त सुखकर व सुसह्य होईल हे बघतानाच त्या औषधोपचाराचे साईड इफेक्टस् कसे कमीत कमी होतील हे बघणे म्हणजे ‘पॅलीएटीव्ह केअर’ घेणे होय.

या प्रकारामध्ये रुग्णाला कमीत कमी शारिरीक दु:ख, यातना कशा होतील, त्याची मानसिकता कशी चांगली राहील, सकारात्मक राहील, त्याच्या कुटुंबियांनी, आप्तस्वकियांनी रुग्णास झालेला आजार मनाने स्वीकारला आहे का, या बाबींकडे तर लक्ष दिले जातेच, या व्यतिरिक्त रुग्ण व त्याचे नातेवाईक यांची पुढील उपाययोजनेबद्दल चर्चा, डॉक्टरांबरोबर सर्वांची एकत्रित व वैयक्तिक चर्चा, सामाजिक काम करणाऱ्यांकडून किंवा तज्ज्ञांकडून रुग्णाचे व त्याच्या जवळच्यांचे समोपदेशन, रोगाची वाढ कशी होणार नाही, त्यात कॉम्प्लिकेशन्स किंवा त्यातील अडचणींची वाढ होणार नाही, इतर आजार जडणार नाहीत, होणार नाहीत, तसेच त्या रुग्णांमुळे इतरांना तो किंवा तत्सम आजार होणार नाहीत या व अशा स्वरूपाची काळजी घेतली जाते.

रुग्णाच्या वैयक्तिक आर्थिक व्यवस्था झाल्या आहेत का? तो त्याच्या स्थावर जंगम मालमत्तेची विल्हेवाट कशी लावणार आहे, त्याची इच्छा काय आहे. याबाबत त्याच्याबरोबर सांगोपांग चर्चा करणे, भविष्यातील तशी व्यवस्था लावण्यास त्याला मदत करणे हाही भाग पॅलीएटीव्ह केअर स्वरूपात येतो.

**(क्रमश:)**

आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...



एक उपयुक्त दागिना...!
अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध
अदृश्य श्रवणयंत्र
अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन
मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**
संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य
संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
Ph.: 2318333, Mob : 9422269394
शाखा : हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक
* अटी लागू

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **कु. मृगजा माधव भावे**<br>फ्लॅट नं. ९, तिरुमला कुबेर अपार्टमेंट, पांडवनगरी, इंदिरानगर, नाशिक – ४२२ ००९.<br>मो. : ९८१९८६३९६३ / ९८१९९२९७४५. | २४/०३/१९९६ | कौशिक | ५'.१'' | M.Com | १८,०००/– |
| २. | **कु. तन्वी जयंत भट**<br>फ्लॅट नं. १०१, ग्रीन वुडस् अपार्टमेंट, पारिजात नगर, नाशिक – ४२२ ००५.<br>मो. : ९६८९७३९४४६. | १७/०९/१९९६ | काश्यप | ५'.४'' | C.S.<br>M.Com | ––– |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मुकुंद श्रीकांत पटवर्धन**<br>फ्लॅट नं. ११, हेरंब रेसिडेन्सी, पाईप लाईन रोड, गंगापूर रोड, नाशिक – ४२२ ०१३.<br>फोन : ०२५३–२३३८०११, मो. : ८६९८९८७३५६. | ०४/०८/१९९० | कौंडिण्य | ५'.९'' | Diploma / Com | २०,०००/– |
| २. | **निखिल श्रीकांत गद्रे**<br>२३, ब्रह्म चैतन्य, विसे मळा, कॉलेज रोड, नाशिक – ४२२ ००५. मो. : ७५८८७००९९०. | ११/१२/१९९१ | कौशिक | ६'.०'' | BE (Elect.) / MBA (HR) / MBA (M & O) | ५५,०००/– |
| ३. | **ऋषिकेश धनंजय जोशी**<br>फ्लॅट नं. १०३, अमर कॉटेजेस, भोसले नगर, हडपसर, पुणे – ४११ ०२८. मो. : ९६५७२२३२८१ | २२/१०/१९९३ | शांडिल्य | ५'.५'' | BE (Mech) | ६०,०००/– |
| ४. | **देवेंद्र पुरुषोत्तम वैद्य**<br>रामदेवजी मंदिरासमोर, ब्राह्मणगल्ली, कसबे वणी, ता. दिडोंरी, नाशिक. मो. : ७६२०१३१५३८ | १४/१०/१९८९ | वत्स | ५'.२'' | HSC | २७,०००/– |
| ५. | **समीर श्रीपाद कुलकर्णी**<br>पद्मवासा, माणेकशा नगर, द्वारका, नाशिक – ४२२ ०११. मो. : ९९००९८२३३३. | १०/०१/१९७० | वशिष्ठ | ५'.४'' | B.E. Ph.D. | ३०,००,०००/–<br>(वार्षिक) |
| ६. | **सुश्रुत प्रदीप केळकर**<br>'आरोह', प्लॉट नं. ३२, सर्व्हे. नं. १०३/०२/०२, रघुनंदन सोसा., नभागण लॉन्सच्या मागे, वडाळा–पाथर्डी रोड, इंदिरानगर, नाशिक – ४२२ ००९.<br>मो. : ९४२०३६२०८५. | ३०/०६/१९९४ | शांडील्य | ६'.१'' | BE (ENTC) | ७०,०००/– |
| ७. | **चैतन्य प्रदीप जोशी**<br>चिंतामणी, प्लॉट नं. ८, वेणुनगर,कामठवाडे, नाशिक – ४२२ ००८.<br>मो. : ९८२३०८९०८०. | ०४/११/१९८७ | शांडील्य | ५'.५'' | BDS, MDS, Ph.D. Penodontology Dentist | ४०,०००/– Pound (वार्षिक) |

# श्री परशुराम नागरी पत संस्था व चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक.

## लक्ष्मीपूजन





उपस्थित मान्यवर




श्री. विजय साने व सौ. ऐश्वर्या साने



आणि पदाधिकारी

## आपल्या संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश भिडे यांची हिंदुस्थान कॉपर लि. च्या संचालकपदी नियुक्ती



राष्ट्रपतींच्या मान्यतेनुसार भारत सरकार अंगीकृत हिंदुस्थान कॉपर लिमिटेड कंपनीच्या इंडिपेंडंट डायरेक्टर (संचालक) पदी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे माजी अध्यक्ष **ॲड. अविनाश भिडे** यांची नियुक्ती करण्यात आली. हिंदुस्थान कॉपर लिमिटेड या कंपनीच्या संचालकपदी नेमणूक होण्याचा पहिलाच मान ॲड. भिडे यांच्या रूपाने नाशिक जिल्ह्याला मिळाला. त्यामुळे राजकीय – सामाजिक, तसेच वकील संघटनेद्वारा ॲड. अविनाश भिडे यांचा सत्कार करण्यात आला.

**संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन**
**व पुढील वाटचालीस शुभेच्छा...!**

BR
Brahmin Reshimgathi
जुळून येती रेशीमगाठी

तुम्ही ब्राह्मण रेशीमगाठी मोबाईल ॲपवर जीवनसाथी शोधू शकता.

- वधू-वरांची नोंदणी करून आपण आपल्या अपेक्षेप्रमाणे अनुरूप स्थळे शोधू शकता.
- ब्राह्मण समाजाच्या सर्व पोटजातींची हजारो स्थळे उपलब्ध.
- स्थळांची विश्वसनीयता.



APP AWESOME FEATURES

- Unlimited profile view
- Send interest / Shortlist profiles
- Set preferences
- Photo Gallery
- Near me profiles
- Advance search

सौ. पूजा लवाटे मो.९३५६२००२०९
Email : brahminreshimgathi@gmail.com
Matrimony Mobile App
GET IT ON Google Play




चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक– २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक–४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ – २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :–**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://facebook.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.